# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६

## राजकीय पक्ष व उमेदवारांसाठी महत्वाच्या सुचना

## ----------- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक ------, २०२५-२६

महानगरपालिका निवडणुकांचे अधिक्षण (superintendence), संचालन (direction) व नियंत्रणाचे (control) पूर्ण अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडे निहित (vested) केले आहेत. त्यानुसार महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक होत आहे. अनेक राजकीय पक्षांचे, आघाडी / फ्रंटचे व उमेदवार निवडणूकीमध्ये उभे राहण्यास इच्छूक असतात. निवडणुकीकरिता इच्छूक उमेदवारांच्या माहितीसाठी ही पुस्तिका प्रसिध्द करण्यात येत आहे.

टिप : १) निवडणूकीकामी इच्छुक उमेदवारांच्या माहितीसाठी निवडणूक विभागाकडून वेळोवेळी प्रसिध्द केलेली जाहिर प्रकटने पहावीत.

२) सदर माहितीपुस्तिकेमध्ये सोप्या भाषेत विषयाचे सार मांडलेले आहे. तथापि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ / मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील तरतुदी व त्याखालील निवडणूक नियम तसेच मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी वेळोवेळी निर्गिमित केलेले आदेश/निदेश व सूचना ग्राह्य व अधिकृत समजण्यात याव्यात.

निवडणूक अधिकारी

-----महानगरपालिका

# प्रकरण – १
## निवडणूक कार्यक्रम

**महानगरपालिकेने आपला सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम येथे जोडावा.**

# प्रकरण - २
# नामनिर्देशनपत्र

## १. नामनिर्देशनपत्र व इतर नमुने :-

इच्छुक उमेदवारांना नामनिर्देशनपत्राचे तसेच शपथपत्राचे छापील नमुने आणि माहितीपुस्तिका महानगरपालिका कार्यालयात--------------- ठिकाणी ----------- वेळेत उपलब्ध आहेत.

परीपूर्ण नामनिर्देशनपत्र तसेच शपथपत्र दि. --------- ते ---------पर्यन्त ---------- या कालावधीत सकाळी ---------ते दुपारी ------वाजेपर्यंत दाखल करता येतील.

**उमेदवार माहिती पुस्तिका** :- महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम २०२५-२६, आचारसंहिता, गुन्हेगारी संबंधीची जोडपत्रे, निवडणूक खर्चाबाबत सादर करावयाची विवरणपत्रे व शपथपत्र, दोन पेक्षा अधिक अपत्ये नसले संबंधीची शपथपत्र नमुना, मतपत्रिकेवर छापावयाचे नावाचे फॉर्म, उमेदवारी मागे घेण्यासंबंधीचे सूचनापत्र व उमेदवार प्रतिनिधी / मतदान प्रतिनिधी / मतमोजणी प्रतिनिधी नेमणुकांचे पत्र, निवडणूक चिन्हांचा तक्ता इत्यादी अर्ज व फॉर्मचा संच प्रत्येकी रक्कम रुपये ---------/- भरल्यानंतर दिले जातील.

उमेदवारांनी पारंपरिक पध्दतीने छापील नामनिर्देशनपत्र भरुन (मतदार यादीत ज्याप्रमाणे नाव व इतर माहिती असेल त्याचप्रमाणे नामनिर्देशन भरणे ) नामनिर्देशनपत्रावर योग्य त्या ठिकाणी सर्व स्वाक्षऱ्या (स्वत:ची तसेच सूचक व अनुमोदक यांची) कराव्यात. शैक्षणिक अर्हता, गुन्हेगारी पार्श्वभूमी तसेच स्थावर व जंगम मालमत्ता याचा तपशील दर्शविणारे शपथपत्र भरुन ते सक्षम प्राधिकाऱ्यासमोर दृढकथन करुन सादर करावे. सोबतची कागदपत्रे उदा. अनामत रक्कम भरल्याची पावती, जातप्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र यांच्या झेरॉक्स प्रती, शौचालय वापराचा दाखला, पक्षाच्या उमेदवाराचे जोडपत्र, उमेदवाराचे नाव इतर प्रभागात असल्यास त्याचा दाखला इ. जोडून विहित कालावधीत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल करणे आवश्यक आहे. विवाहित स्त्री ने तिचे नाव

बदलल्यासंदर्भात कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. नामनिर्देशनपत्रासोबत जोडावयाच्या अन्य कागदपत्रांची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातून घ्यावी.

२. **निवडणूक लढविण्याकरिता उमेदवाराने खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे :-**

- नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास वयाची २१ वर्ष पूर्ण असणे आवश्यक आहे.
- महानगरपालिकेच्या मतदार यादीत नाव असणे आवश्यक आहे.
- अधिनियमातील तरतूदीनुसार उमेदवार अनर्ह ठरणारा नसावा (निवडणूक खर्चाचा हिशोब विहित कालावधीत सादर न केल्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने अनर्ह ठरविलेल्या उमेदवारास अनर्हतेचा कालावधी पूर्ण झाल्याशिवाय नामनिर्देशन पत्र भरता येणार नाहीत.
- मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम ३ (अ३) तथा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम २ (३अ) अन्वये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग या संज्ञेत इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती या समाविष्ट आहेत. तसेच शासनाच्या समाज कल्याण विभागाचे दि . ०५ ऑक्टोबर, १९९६ च्या पत्रानुसार विशेष मागास प्रवर्गात समावेश केलेल्या जातींना सुध्दा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गामधुन निवडणूक लढविता येईल.
- राखीव जागेवरुन निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराकडे संबंधित अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग यांचे जातप्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास जात पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची पोचपावती नामनिर्देशनपत्रासोबत सादर करण्याची मुभा आहे.
- स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य होण्यासाठी शौचालय असणे व त्याचा वापर करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र अथवा स्वयंप्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३. **कायद्यातील तरतुदी** – इच्छूक उमेदवारांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ८, ९ व १० तसेच त्याअंतर्गत निवडणूक नियम अथवा यथास्थिती बृहन्मुंबई

महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ११, १४, १६ व २६ ते ३३ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक नियमावली, २००६ मधील तरतुदींचे वाचन करावे. जेणेकरुन निवडणुकीकरिता असलेल्या अर्हता, अनर्हता व इतर बाबींची माहिती मिळेल.

**४. सूचक/प्रस्तावक व अनुमोदक :-**

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २६ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखालील निवडणूक नियम क्र. ९ नुसार उमेदवाराचे नामनिर्देशन करण्याकरिता सूचक / प्रस्तावक व अनुमोदक कोण राहू शकेल याबाबत तरतूदी आहेत. त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. जी व्यक्ती मतदार म्हणून अपात्र नसेल व ज्या प्रभागात उमेदवारास नामनिर्देशित करावयाचे आहे, अशा संबधित प्रभागाच्या मतदार यादीत ज्याचे नाव समाविष्ट केले आहे अशी कोणतीही व्यक्ती सूचक / प्रस्तावक व अनुमोदक म्हणून पात्र राहील. यासंदर्भातील सविस्तर महितीकरीता उपरोक्त तरतुदींचे संपूर्ण वाचन करावे.

अ) **प्रस्तावक व अनुमोदक** - ज्या प्रभागासाठी नामनिर्देशन भरावयाचे आहे त्याच प्रभागातील मतदारच प्रस्तावक व अनुमोदनकर्ता म्हणून असणे आवश्यक आहे.

**ब)** इच्छुक उमेदवारांनी बिनचुक पूर्ण भरलेली नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या दिनांकास व वेळेमध्येच स्वतः किंवा सूचक किंवा अनुमोदकामार्फत दाखल करणे आवश्यक आहे.

**क)** नामनिर्देशनपत्राबरोबर उमेदवाराने रोख अनामत रक्कम भरलेली महानगरपालिकेची मूळ पावती जोडणे जरुरीचे आहे. मात्र अशा पावतीचा क्रमांक, दिनांक अथवा झेरॉक्स प्रत आपले माहितीसाठी जपून ठेवावी.

**ड) गुन्हेगारी व मालमत्ते सबंधी तसेच दोनपेक्षा अधिक अपत्ये नसल्यासंबंधी**:- राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रियेमध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांचा सहभाग रोखण्याच्या दृष्टिने व मालमत्तेसंबंधी माहिती देणेकामी आदेश काढले आहेत.

दि. १२ सप्टेंबर, २००१ नंतर झालेल्या अपत्यामुळे एकूण अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक होत असल्यास, ती व्यक्ती महानगरपालिकेची निवडणूक लढविण्यासाठी अपात्र ठरविण्यात येते.

नामनिर्देशन पत्रासोबत विहीत नमुन्यातील शपथपत्र सादर करणे बंधनकारक आहे. सदरचे शपथपत्र प्रथमवर्ग दंडाधिकारी, ओथ कमिशनर, नोटरी पब्लिक किंवा शपथपत्र देण्यासाठी सक्षम असलेले प्राधिकारी अथवा शासकीय अधिकारी यांचेपुढे करावे लागेल.

**५. नामनिर्देशन पत्र सादर करतेवेळी उपस्थित राहू शकणाऱ्या व्यक्ती व गाड्यांची संख्या :-**

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात जास्तीत जास्त २ वाहनांना परवानगी देण्यात येईल. उमेदवार मिरवणुकीने येत असल्यास १०० मीटर अथवा पोलीसांच्या निर्देशानुसार अगोदर मिरवणूक थांबवावी.

सदरचे नामनिर्देशन पत्र उमेदवार स्वतः किंवा सुचकामार्फत किंवा अनुमोदकामार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास सादर करतील. त्यावेळी त्यांचे सोबत जास्तीत जास्त २ व्यक्तींना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात प्रवेश मिळेल. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यानी अनावश्यक गर्दी रोखण्यासाठी पोलीस यंत्रणेच्या सहकार्याने, योग्य तो पोलीस बंदोबस्त ठेवलेला असतो.

**६. नामनिर्देशन पत्रांची संख्या :**

१. उमेदवार एकापेक्षा जास्त निवडणूक प्रभागात नामनिर्देशनपत्रे भरु शकतात.
२. एका निवडणूक प्रभागातील एका जागेसाठी एका उमेदवाराला जास्तीत जास्त चार नामनिर्देशनपत्रे भरता येतात.
३. **एखाद्या उमेदवारास राजकीय पक्षातर्फे आणि अपक्ष अथवा इतर पक्षातर्फे उमेदवारी अर्ज दाखल करावयाचा असल्यास तो प्रत्येक पक्षासाठी किंवा अपक्ष म्हणून स्वतंत्र नामनिर्देशन पत्र भरुन दाखल करता येईल.**

## ७. अनामत रक्कम :

महानगरपालिका निवडणुकांकरिता उमेदवाराने आपल्या नामनिर्देशन पत्रासोबत खालीलप्रमाणे अनामत रक्कम भरावयाची आहे.

| उमेदवाराचा प्रवर्ग | महानगरपालिका निवडणुकांकरीता अनामत रक्कम |
|---|---|
| सर्वसाधारण* | रु. ५०००/- |
| अनुसूचित जाती | रु. २५००/- |
| अनुसूचित जमाती | रु. २५००/- |
| नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | रु. २५००/- |
| सर्व प्रवर्गातील महिला | रु. २५००/- |

*सर्वसाधारण जागेवर जरी अनुसूचित जाती/जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या उमेदवारांनी अर्ज केला तर त्यास अर्धीच अनामत रक्कम देय राहील. परंतु अशी सूट देण्यास तो पात्र आहे याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवाराने जात प्रमाणपत्रासंबंधी नामनिर्देशनपत्रासोबत सादर केलेली कागदपत्रे तपासून स्वतःची खात्री करतील.

एकाच निवडणूक प्रभागातील एका जागेसाठी एकापेक्षा जास्त नामनिर्देशन पत्रे भरली तरी अनामत रक्कम एकदाच भरता येईल. परंतु वेगवेगळया जागांकरीता अथवा वेगळ्या प्रभागांमधील जागेकरीता स्वतंत्र अनामत रक्कम भरावी लागेल.

## ८. प्रभागातील एकाच जागेची निवडणूक लढविता येते :

राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.८/का.५, दि.०३/०१/२०१७ अन्वये बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एक उमेदवार एका प्रभागातील एकाच जागेवर निवडणूक लढवू शकेल. तथापि, अन्य प्रभागातील जागेवर त्या उमेदवाराने निवडणूक लढविण्यास बंदी असणार नाही. एका उमेदवाराने **एकाच प्रभागातील एकापेक्षा जास्त जागांसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास छाननीच्यावेळी कोणत्या जागेची निवडणूक लढवावयाची आहे याविषयी उमेदवाराची लेखी इच्छा विचारात घेण्यात येते. उमेदवाराने अशी इच्छा व्यक्त न केल्यास प्रथमत: प्राप्त झालेले वैध नामनिर्देशनपत्र विचारात घेण्यात येते.**

## ९. उमेदवाराचे मतपत्रिकेवरील नाव छापण्याबाबत :

एखादा उमेदवार आपले नाव मतपत्रिकेवर कशा प्रकारे छापण्यात यावे, याबाबत नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटची तारीख व वेळ यापूर्वी विहित नमून्यात कळवू शकतो.

उमेदवाराचे नाव मतपत्रिकेवर त्यानुसार छापण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी निर्णय घेऊ शकतात. मात्र, त्यानुसार नावे छापताना त्याचा मतपत्रिकेवरील अनुक्रम नगर विकास विभागाने दि.०५ डिसेंबर, २०२५ रोजी नियमात दुरूस्ती केल्यानुसार त्याचा मतपत्रिकेवरील क्रम गटनिहाय त्याचे मराठी वर्णानुक्रमे आडनाव, नाव व पत्ता विचारात घेऊन त्यानुसार राहील.

**१०. राखीव जागा असल्यास उमेदवाराचा प्रवर्ग :**

जी जागा ज्या प्रवर्गासाठी राखीव आहे, त्याच प्रवर्गातील उमेदवारांना सदर जागेची निवडणूक लढविता येईल. सबब, सादर करण्यात आलेले नामनिर्देशन पत्र हे त्याच प्रवर्गासाठी आहे याची खात्री करावी.

**११. नामनिर्देशनपत्र दाखल करण्यासंदर्भातील इतर बाबी-**

i. **नामनिर्देशन पत्रावर उमेदवार, सूचक/प्रस्तावक व अनुमोदक यांची सही आहे याची खात्री करावी.**

ii. **उमेदवार, सूचक व अनुमोदक यांचे मतदार यादीतील अनुक्रमांक योग्यरित्या नमूद करावेत.**

नामनिर्देशन पत्रात नमूद उमेदवारांचा / सूचकाचा / अनुमोदकाचा मतदार यादीतील अनुक्रमांक व नाव हे मतदार यादीतील अनुक्रमांक व नावाशी जुळते आहे वा कसे हे तपासावे.

iii. **विवाहित महिलेचे मतपत्रिकेवरील नाव :**

विवाहित महिला उमेदवारास, मतदार यादीमध्ये व नामनिर्देशन पत्रामध्ये नमूद असलेल्या नावाखेरीज त्यांना मतपत्रिकेवर इतर नावाचा उल्लेख करण्याची इच्छा असेल तर नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी संबंधित उमेदवाराने तसा विनंती अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सादर करता येईल व त्यासोबत त्या पृष्ठर्थ आवश्यक पुरावे उदा. विवाह नोंदणी प्रमाणपत्र ,राजपत्रात प्रसिध्द केलेले विवाहानंतरचे नाव इ., सादर करावी.

iv. **मतदार यादीचा उतारा (उमेदवार अन्य प्रभागातील मतदार असल्यास) :**

उमेदवार हा दुसऱ्या प्रभागातील मतदार असेल त्या बाबतीत, त्या प्रभागातील मतदार यादी किंवा तिचा संबंधीत भाग किंवा त्या मतदार यादीतील संबंधित नोंदीची एक प्रमाणित प्रत ही नामनिर्देशन पत्रासोबत द्यावी.

v. **जात प्रमाणपत्र/जातवैधता प्रमाणपत्र अथवा पुरावा :**

राखीव जागेसाठी (अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग) निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच नामनिर्देशन पत्राच्या छाननीच्यावेळी पडताळणीसाठी मूळ जाती प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

मात्र शासनाने दि. ०३ नोव्हेंबर, २०२५ च्या अध्यादेशान्वये जात वैधता प्रमाणपत्र दाखल करण्यास निवडून आल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांची मुभा दिली आहे. त्यामुळे नामनिर्देशनपत्र दाखल करताना उमेदवारास जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत अथवा अन्य कोणताही पुरावा नामनिर्देशनपत्रासोबत देता येईल. तसेच त्याने निवडून आल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे हमीपत्र नामनिर्देशनपत्रासोबत देणे आवश्यक आहे. अन्यथा सदर उमेदवार हा पूर्वलक्षी प्रभावाने अनर्ह होऊ शकतो.

vi. **शौचालय वापराबाबतचे प्रमाणपत्र :**

शासनाने सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१९ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य होण्याकरीता शौचालयाच्या वापराबाबतची सुधारणा केली आहे. त्यानुसार पदनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र किंवा स्वयंप्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असून विहित केलेले प्रमाणपत्र /स्वयंप्रमाणपत्र द्यावे.

vii. **तृतीयपंथी उमेदवार :**

सर्व तृतीयपंथी यांना त्यांनी स्वसमजानुसार केलेल्या लिंग ओळखीच्या आधारे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्याच्या अधिकार असून अशा निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने इतर सर्व हेतूंसाठी त्यांच्या निवडलेल्या लिंगाचा वापर केलेला असावा व अशी निवडणूक लढविणारी व्यक्ती इतर सर्व कारणांसाठी त्याच निवडलेल्या

लिंगाचा वापर करेल आणि तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम २०१९ मध्ये दिलेल्या योग्य प्रक्रियेचे पालन केल्याशिवाय केवळ संधी आहे म्हणून लिंगाची ओळख बदलणार नाही असे शपथपत्र देणे आवश्यक आहे.

viii. **राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांबाबतची सूचना :**

महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५ दि. ०५ मे, २०२५ अन्वये विहित केलेले जोडपत्र - १ व २ नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अखेरच्या तारखेस दुपारी ३.०० वाजेपर्यंत **(बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत)** निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

जोडपत्र - २ वर राजकीय पक्षाने प्राधिकृत केलेल्या व्यक्तिची पेनाने केलेली मूळ सही (शाई मधील) असणे आवश्यक राहील. फॅक्स, झेरॉक्स, ई-मेल, Whats App वरील जोडपत्र - २ चालणार नाही.

महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे जोडपत्र - १ दिल्यास महानगरपालिका आयुक्त त्या जोडपत्र-१ च्या प्रती प्रमाणीत करुन संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे पाठवतील.

ix. **परिपूर्ण शपथपत्र :**

उमेदवाराने सादर केलेली, गुन्हेगारी पार्श्वभूमी व स्थावर / जंगम मालमत्तेचा तपशील देणारे शपथपत्र स्टॅम्प पेपरवर करण्याची आवश्यकता नाही. परंतु संबधित शपथपत्रातील कोणताही रकाना / माहिती कोरी ठेवू नये. माहिती निरंक/संबंधीत नसल्यास / वा माहित नसल्यास (Nil / Not applicable or Not Known) असे शेरे असणे आवश्यक आहे. रकाने कोरे ठेवल्यास नामनिर्देशनपत्र नाकारले जाऊ शकते.

x. **नामनिर्देशनपत्र सादर करण्यापूर्वी निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात प्राथमिक तपासणी करुन घेता येईल:**

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास प्राथमिक तपासणीत लक्षात आलेल्या त्रुटी उमेदवारांच्या निदर्शनास आणून देण्यात येतात व त्रुटी दूर करण्याची त्यांना संधी देण्यात येते; जेणेकरुन नामनिर्देशन पत्रावर उमेदवार अथवा सूचक / अनुमोदक यांची स्वाक्षरी राहिली असल्यास अथवा अन्य काही त्रुटी असल्यास त्यांना त्या दुरूस्त करण्याची संधी मिळू शकेल. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आल्यानंतर त्यामध्ये दुरूस्ती करता येणार नाही. मात्र अशा दुरुस्त्या करण्यासाठी

उमेदवारास नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिनांक व वेळेपर्यंत नव्याने नामनिर्देशन पत्र दाखल करावे लागेल.

**१२. नामनिर्देशन पत्राची पोच :**

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी उमेदवारांना नामनिर्देशन पत्राची प्राथमिक चाचणी करून चेकलिस्ट दिल्यानंतर नामनिर्देशन पत्राच्या "भाग चार" मध्ये असणारी पोच, छाननीचे ठिकाण व वेळ नमूद करून देतात.

**१३. नामनिर्देशनपत्र व शपथपत्राचा प्रसार :**

निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवारांनी सादर केलेली प्राप्त नामनिर्देशनपत्र व शपथपत्राच्या प्रती, सूचना फलकावर चिकटवून व वेबसाईटवर टाकून त्याचा प्रसार करतात. प्रचाराचा कालावधी संपेपर्यंत निवडणूक लढविणारा उमेदवार तसेच प्रसिध्दी माध्यमे यांना योग्य ते शुल्क आकारुन नामनिर्देशनपत्राच्या व शपथपत्राच्या प्रती देण्यात येतात. कोणत्याही प्रतिस्पर्धी उमेदवाराने स्वतः शपथपत्राद्वारे परस्परविरोधी माहिती सादर केली असली तरी त्या माहितीचा देखील वरीलप्रमाणेच प्रसार करण्यात येतो.

# प्रकरण – ३

# छाननी

**छाननीसाठी उपस्थित राहण्यास कोण पात्र आहे?**

१. **बृहन्मुंबई महानगरपालिका** – निवडणूक नियमावली २००६ च्या नियम ९(१) अन्वये छाननीच्या तारखेस व वेळेस उमेदवार, त्याचे निवडणूक प्रतिनिधी, सूचक किंवा अनुमोदक अथवा उमेदवाराने लेखी प्राधिकृत केलेली एक व्यक्ती यांचे व्यतिरिक्त अन्य कोणालाही छाननीच्या ठिकाणी उपस्थित राहाता येणार नाही.

**इतर महानगरपालिका** – महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखालील निवडणूक नियम ९(८) अन्वये छाननीच्या तारखेस व वेळेस उमेदवार, प्रत्येकी एक सूचक आणि उमेदवाराने रितसर प्राधिकृत केलेली अन्य एक व्यक्ती यांचे व्यतिरिक्त अन्य कोणालाही छाननीच्या ठिकाणी उपस्थित राहाता येणार नाही.

२. **एका प्रभागातील एकाच जागेची निवडणूक लढविता येते :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व त्यातील निवडणूक नियमानुसार तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/मनपा-२०१६/प्र.क्र.८/का.५, दि.०३/०१/२०१७ अन्वये बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये एक उमेदवार एका प्रभागातील एकाच जागेवर निवडणूक लढवू शकेल. तथापि, अन्य प्रभागातील जागेवर त्या उमेदवाराने निवडणूक लढविण्यास बंदी असणार नाही. एका उमेदवाराने एकाच प्रभागातील एकापेक्षा जास्त जागांसाठी नामनिर्देशनपत्र दाखल केल्यास छाननीच्यावेळी कोणत्या जागेची निवडणूक लढवावयाची आहे याविषयी उमेदवाराची लेखी इच्छा विचारात घेण्यात यावी. उमेदवाराने अशी इच्छा व्यक्त न केल्यास प्रथमत: प्राप्त झालेले वैध नामनिर्देशनपत्र विचारात घेण्यात यावे.

३. **नामनिर्देशन पत्र ज्या कारणास्तव नामंजूर होऊ शकते अशी काही कारणे :**

i) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १० किंवा मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६ नुसार किंवा त्याअंतर्गत नियमातील तरतुदीनुसार निवडणूक लढविण्यास उमेदवार म्हणून अपात्र ठरविण्यात आले आहे;

ii) उमेदवाराला नामनिर्देशित करण्यासाठी सूचक किंवा अनुमोदक योग्यरितीने अर्ह नसेल. (उमेदवार ज्या प्रभागातून निवडणूक लढविणार त्याच प्रभागातील मतदार सूचक व अनुमोदक राहू शकतात)

iii) उमेदवार, सूचक / प्रस्तावक किंवा अनुमोदक यांची स्वाक्षरी नाही.

iv) योग्य अनामत रक्कम भरलेली नाही.

v) राखीव जागेवरुन नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास आवश्यक कागदपत्रे नाहीत.

## ४. उमेदवारी मागे घेणे संबधीची नोटीस

i. कोणत्याही उमेदवारास-

मुंबई महानगरपालिका अधिनियमांतर्गत निवडणूक नियम क्र. १० व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत निवडणूक नियम क्र. ९-अ अन्वये वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर ते राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत त्याने सही केलेल्या व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्वाधीन केलेल्या विहित नमुन्यातील लेखी नोटिशीद्वारे आपली उमेदवारी मागे घेता येईल.

ii. नामनिर्देशपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजण्यापूर्वी उमेदवारी मागे घेण्यासंबंधिची नोटीस, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्यात येईल. तद्नंतर प्राप्त नोटिशींना कायदेशीर अर्थ नसून अशा नोटिसा स्विकारण्यात येणार नाहीत.

iii. अशी नोटीस उमेदवार स्वत: किंवा आपल्या सुचकामार्फत किंवा अनुमोदकामार्फत वा आपल्या लेखी प्राधिकृत केलेल्या निवडणूक प्रतिनिधीमार्फत देईल.

iv. उमेदवारी मागे घेण्याच्या नोटिशीच्या खरेपणाबाबत तसेच ती सादर करणाऱ्या व्यक्तीच्या खरेपणाबाबत निवडणूक निर्णय अधिकारी स्वत: खात्री करेल व अशा प्राप्त नोटिशीबाबत रितसर पोच देईल.

v. अशी खात्री केलेली नोटीस प्राप्त झाल्यानंतर ती मागे घेण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

# प्रकरण – ४
# चिन्ह वाटप

महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५, दि. ०५ मे, २०२५ रोजी प्रसिध्द केले आहेत. त्यानुसार जे पक्ष राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी करतील, केवळ त्याच पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका लढविताना चिन्ह राखून ठेवता येते किंवा प्राधान्याने चिन्ह वाटप करता येते.

ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांची यादी राज्य निवडणूक आयोग वेळोवळी प्रसिध्द करते. त्या यादीनुसारच चिन्ह वाटप करण्यात येते.

**निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी**

नगरविकास विभागाने अधिसुचना दि.०५ डिसेंबर,२०२५ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच अन्य महानगरपालिकांच्या निवडणूक नियमात सुधारणा केली असून त्यानुसार निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी खालील प्रमाणे करणे आवश्यक आहे:-

**पहिला गट –** भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेली आहे असे मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष व महाराष्ट्र राज्यातील मान्यतप्राप्त राज्यस्तरीय पक्ष यांचे उमेदवार .

**दुसरा गट –** भारत निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या ज्या इतर राज्यातील राज्यस्तरीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांचे उमेदवार.

**तिसरा गट** –राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी झालेले अमान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांचे उमेदवार .

**चौथा गट –** अपक्ष उमेदवार.

वरीलप्रमाणे प्रत्येक गटातील उमेदवारांचा क्रम लावताना तो मराठी भाषेतील वर्णानुक्रमानुसार लावण्यात यावा. उमेदवारांचा क्रम लावताना प्रथम त्यांचे आडनाव, (आडनाव नसल्यास नाव) व त्यानंतर पत्ता विचारात घेण्यात येतो.

निवडणूक लढविण्याऱ्या उमेदवारांची यादी वरील सुधारित तरतुदीनुसार करण्यात येते.

पर्यायाने मतपत्रिकेवरील उमेदवारांचा क्रम देखील वरील तरतुदीनुसार राहील.

**मतपत्रिकेवरील नाव कसे राहिल** :- एखादा उमेदवार आपले नाव मतपत्रिकेवर कशा प्रकारे छापण्यात यावे, याबाबत नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटची तारीख व वेळ यापूर्वी कळवू शकतो. उमेदवाराचे नाव मतपत्रिकेवर त्यानुसार छापण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी निर्णय घेऊ शकतात. मात्र, नावे छापताना त्याचा मतपत्रिकेवरील अनुक्रम वर नमुद केलेल्या दि. ०५ डिसेंबर, २०२५ च्या तरतुदीनुसार राहील.

**राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५ दि. ०५ मे, २०२५ च्या आदेशान्वये** राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत राजकीय पक्ष व अपक्ष उमेदवारांना चिन्हांचे वाटप कशाप्रकारे करावे याबाबत अधिसूचित केले आहे. या अधिसूचनेच्या **भाग चार** मध्ये नमूद केलेल्या तरतूदींच्या आधारे **निवडणूक चिन्ह वाटप करण्यात येते.**

**१. उपरोक्त आदेशानुसार चिन्ह वाटपाच्या संदर्भातील तरतुदी थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत:-**

i. उमेदवाराच्या नामनिर्देशनपत्रामध्ये तो ज्या पक्षाचा उमेदवार म्हणून निवडणूक लढवित आहे त्याचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

ii. संबंधित राजकीय पक्षाने विहित कालावधीमध्ये उमेदवाराचे सुचनापत्र व ते सही करण्यास सक्षम असलेला अधिकारी कोण याबाबतची जोडपत्र-१ व जोडपत्र-२, महानगरपालिका आयुक्त आणि संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी निश्चित केलेल्या विहित वेळेपर्यंत किंवा तत्पूर्वी सादर करणे आवश्यक आहे.

iii राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केलेले राष्ट्रीय अथवा राज्यस्तरीय पक्ष तसेच इतर पक्ष यांनी उभे केलेले उमेदवार महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५ दि. ०५ मे, २०२५ च्या आदेशातील परिच्छेद क्र. २० मधील अटी पूर्ण करीत असल्यास त्यांना त्यानुसार त्या पक्षाकरिता राखीव असलेले चिन्ह वाटप करता येईल किंवा चिन्ह वाटपामध्ये प्राधान्य मिळेल.

iv. बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षाद्वारे उभे करण्यात येणारे उमेदवार तसेच अपक्ष उमेदवार यांना मुक्त चिन्ह वाटप करण्याबाबतची कार्यपध्दती सदर आदेशाच्या परिच्छेद क्र. १५ अन्वये विहित करण्यात आलेली आहे. त्यानुसार उदा. एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्षाच्या "अ" जागेवरील उमेदवारास वाटप झालेले मुक्त चिन्ह त्याच पक्षाच्या त्या प्रभागातील अन्य जागांवरील उमेदवारांना देता येईल. तसेच प्रभागात निवडणूक लढविणाऱ्या सर्व अपक्ष उमेदवारांना वेगवेगळ्या मुक्त चिन्हांचे वाटप होईल, यादृष्टीने या परिच्छेदात तरतुदी आहेत.

v. जर एखाद्या राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाने संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लगतच्या मागील सार्वत्रिक निवडणूकीत किमान ५ टक्के जागा जिंकल्या असतील तर त्या पक्षास उपरोक्त आदेशातील परिच्छेद क्र. १७ मधील तरतूदीनुसार मुक्त चिन्हांपैकी एक मुक्त चिन्ह त्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी तात्पुरत्या स्वरुपात आरक्षित करता येईल.

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत अमान्यताप्राप्त असलेल्या इतर पक्षांना मुक्त चिन्हांमधील त्यांनी मागणी केलेले एक मुक्त चिन्ह प्राधान्याने देता येईल. (ज्या अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी केली आहे अशा पक्षांना राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी न केलेले पक्ष व अपक्ष उमेदवार यांच्यावर प्राधान्याने मुक्त चिन्ह वाटप करण्यात येते.) याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात येते:-

(अ) जेथे एखाद्या मुक्त चिन्हाची मागणी केवळ एकाच अमान्यताप्राप्त नोंदणीकृत राजकीय पक्षाच्या उमेदवाराने केली असेल तेथे ते मुक्त चिन्ह त्या उमेदवारास देण्यात येईल.

(ब) जेथे एखाद्या मुक्त चिन्हाची मागणी दोन किंवा अधिक नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी केली असेल त्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठ्या टाकून कोणत्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यावयाचे हे ठरवील.

vi. राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी न झालेल्या राजकीय पक्षाच्या उमेदवारांना अपक्ष उमेदवार असल्याचे मानण्यात येईल. या अपक्ष उमेदवार यांना खालीलप्रमाणे मुक्त चिन्ह वाटप करण्यात येईल :-

(अ) जेथे एकापेक्षा जास्त उमेदवारांनी एकाच मुक्त चिन्हाची मागणी केली असेल त्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी चिठ्ठ्या टाकून कोणत्या उमेदवारास ते मुक्त चिन्ह द्यावयाचे हे ठरवील.

**२. पर्यायी उमेदवार –**

जर जोडपत्र-२ नमुन्यांमध्ये एका उमेदवारास मुळ उमेदवार व दुसऱ्या उमेदवारास पर्यायी उमेदवार असल्याचा उल्लेख असेल व पक्षाच्या जोडपत्र-२ वर सही करण्यास सक्षम असणाऱ्या व्यक्तीने दिले असेल अशा वेळी त्या मुळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र वैध ठरल्यास त्याला पक्षाचा अधिकृत उमेदवार गृहित धरावे. अशा परिस्थितीत पर्यायी उमेदवारास त्याने माघार न घेतल्यास व इतर बाबींसंदर्भात पात्र असल्यास अपक्ष उमेदवार समजण्यात येईल. मुळ उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरल्यास अथवा मुळ उमेदवाराने माघार घेतल्यास पर्यायी उमेदवार हा इतर बाबींसंदर्भात पात्र असल्यास पक्षाचा अधिकृत उमेदवार समजण्यात येईल.

३. उपरोक्त दि. ०५ मे, २०२५ च्या आदेशातील परिच्छेद क्र. २१ अन्वये एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा जास्त राजकीय पक्षाच्यावतीने नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास करावयाची कार्यवाही विहित केली आहे.

४. राजकीय पक्षांच्या अधिकृत उमेदवारांबाबतची सूचना नामनिर्देशनपत्र भरावयाच्या शेवटच्या दिवशी त्यासाठी विहित वेळेपर्यंत किंवा त्यापूर्वी प्राप्त झाली पाहिजे. पक्षाने एकापेक्षा जास्त उमेदवारांना जोडपत्र-२ मधील लेखी सूचनापत्र दिले असल्यास उपरोक्त आदेशातील परिच्छेद क्र. २२ नुसार कार्यवाही करावी. त्यानुसार जर पक्षातर्फे मूळ उमेदवार म्हणून दोघांना विहित नमुने देण्यात आले असतील व त्यापैकी कोणता उमेदवार पक्षाचा अधिकृत उमेदवार राहील याबाबत नामनिर्देशनपत्र

भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत निश्चित केलेल्या वेळेत पक्षाकडून कोणतेही सूचनापत्र देण्यात आले नसेल तर ज्या उमेदवाराचे नामनिर्देशन प्रथम प्राप्त झाले असेल. त्याला पक्षाचा अधिकृत उमेदवार म्हणून गृहीत धरण्यात यावे.

५. उमेदवारी मागे घेणे- वैधरित्या नामनिर्देशित झालेली उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर उमेदवार आपली उमेदवारी मागे घेण्याबाबतची लेखी सूचना निवडणूक निर्णय अधिकारी यांना नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी निश्चित केलेल्या वेळेपर्यंत देऊ शकतात अशी सूचना उमेदवार स्वत: अथवा त्याचे सूचक/अनुमोदक अथवा उमेदवाराने प्राधिकृत केलेली व्यक्ती आणून देऊ शकते, निवडणूक निर्णय अधिकारी अशी लेखी सूचना मिळाल्यानंतर त्याचा खरेपणा पडताळून व अशी सूचना आणून देणाऱ्या व्यक्तीची ओळख पटवून त्याची प्रत सूचना फलकावर लावतील.

# प्रकरण – ५

## विविध परवानग्या

या ठिकाणी विविध परवानग्या जसे सभा, रॅली, बॅनर, वाहन इ. कोठे मिळतील व त्यासाठी अर्जाचा नमुना, आवश्यक कागदपत्रे इ. माहिती देण्यात येईल.

**महानगरपालिकेने याबाबत निश्चित केलेली कार्यवाही दर्शवावी**

# प्रकरण – ६

## प्रचार कार्यालय, मतदार बुथ इ. स्थापन करण्याची कार्यपध्दती.

**महानगरपालिकेने याबाबत निश्चित केलेली कार्यवाही दर्शवावी**

## प्रकरण – ७

# निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी, मतमोजणी प्रतिनिधी इ. नियुक्त करण्याकरिता अर्जाचे नमुने व इतर माहिती.

## १. सर्वसाधारण –

i) उमेदवारांना प्रत्येक मतदान केंद्रासाठी प्रत्येक १ याप्रमाणे मतदान प्रतिनिधी नेमता येईल. मतदान प्रतिनिधी वा मतमोजणी प्रतिनिधी नेमणूकीबाबतचे अर्जाचे नमुने नामनिर्देशन पत्रासोबत देण्यात आलेले आहेत. मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्त करावयाची व्यक्ती संबंधित प्रभागातील राहणारी असावी व तिला मतदार ओळखता यावेत. ज्या व्यक्तिविरुध्द गुन्हेगाराची नोंद असेल किंवा निवडणूक विषयी गैरव्यवहारात समाविष्ट असल्याची पुर्वीची नोंद असेल किंवा त्याच्या वर्तणुकीमुळे मतदारांमध्ये दहशत पसरु शकेल अशा व्यक्तिंना मतदान प्रतिनिधी म्हणून नेमण्यात येवू नये.

ii) उमेदवारास त्याचे स्वतःचे ओळखपत्र, त्याचे प्रतिनिधीचे ओळखपत्र तसेच मतदान प्रतिनिधीचे, मतमोजणी प्रतिनिधीचे ओळखपत्रे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून दिली जातील. उमेदवार यांनी आपले व आपल्या सर्व प्रतिनिधीचे फोटो अशा नेमणुकीसाठी करावयाचे अर्जासोबत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये मतदान दिनांकाचे किमान आठ दिवस अगोदर दिले पाहिजेत म्हणजे त्यानुसार ओळखपत्र देणे सोयीचे होईल. मतदानाचे दिवसाचे किमान १ दिवस अगोदर नेमणूक पत्रे (ओळखपत्रे) घेतली पाहीजेत.

iii) मतदान प्रतिनिधीची ओळखपत्रे संबंधित मतदान केंद्रावर त्यांना दिलेली नेमणूक पत्रे हजर केलेनंतरच मतदान केंद्राध्यक्षांकडून देण्यात येईल. ओळखपत्र हरविल्यास अगर गहाळ केल्यास संबंधित प्रतिनिधीस मतदान केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. ज्या मतदान केंद्रासाठी ओळखपत्र व नेमणूक पत्र दिले आहे त्याच मतदान केंद्रासाठी वापरता येईल.

iv) मतमोजणी प्रतिनिधींना ओळखपत्राशिवाय मतमोजणी केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. अथवा इतर मतमोजणी केंद्रावर फिरु दिले जाणार नाही.

## २. निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक:-

१) निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक करण्याकरीता उमेदवार विहित नमुन्यात नेमणुकीची सूचना दोन प्रतीमध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे देतील. निवडणूक निर्णय अधिकारी त्यातील एकप्रत उमेदवारांच्या प्रतिनिधींना सदर नेमणुकीस मान्यता असल्याबाबतची पोचपावती आपल्या सही शिक्क्यानिशी देतील. निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी “फोटो ओळखपत्रे” जारी करतील.

२) निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक रद्द केल्याची किंवा निवडणूक प्रतिनिधीचे निधन झाल्यास सदरची सूचना विहित नमुन्यात देतील.

## ३. मतदान प्रतिनिधींची नेमणूक:-

१) उमेदवारास प्रत्येक मतदान केंद्राकरीता किंवा जेथे मतदान घेण्यासाठी ठिकाण नक्की केले आहे त्यासाठी एक मतदान प्रतिनिधी व एक बदली मतदान प्रतिनिधींची नेमणूक करता येईल.

२) अशी प्रत्येक नेमणूक उमेदवार किंवा त्यांचा निवडणूक प्रतिनिधी मतदान केंद्रावर किंवा मतदान घेण्यासाठी नक्की केलेल्या स्थळी विहित नमुन्यात तपशील भरून सादर करतील. मतदान केंद्राध्यक्ष त्यांना बिल्ले पुरवितील.

३) विहित नमुन्यात नेमणुकीचे पत्र, पूर्ण भरलेले व घोषणापत्र मतदान केंद्राध्यक्षांसमोर सही केल्याशिवाय मतदान प्रतिनिधीला मतदान केंद्रामध्ये मतदानाच्या दिवशी प्रवेश मिळणार नाही.

## ४. मतदान प्रतिनिधींची नेमणूक रद्द करणे किंवा मतदान प्रतिनिधींचे निधन:-

i. मतदान प्रतिनिधींची नेमणूक रद्द करण्याबाबत विहित नमुन्यामध्ये उमेदवार किंवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांचे सहीने मतदान केंद्र अध्यक्षांना (अर्ज) सादर करतील. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास ज्या दिवशी असा अर्ज प्राप्त होईल त्या दिवसापासून सदर नेमणूक रद्द झाल्याचे मानण्यात येईल. तरी सदर घोषणापत्राची रितसर पोच द्यावी.

ii. उमेदवार किंवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी मतदान बंद होण्यापूर्वी कोणत्याही वेळी सूचना देऊन दुसऱ्या निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक करता येईल.

## ५.	प्रतिनिधी म्हणून कोणास नेमता येणार नाही :

प्रतिनिधींच्या नेमणूका करताना ज्या व्यक्तीस मतदान करण्यास किंवा निवडून येण्यास अपात्र ठरविण्यात आले असेल अशी व्यक्ती निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमता येणार नाही. तसेच राज्य विधानमंडळ सदस्य (विधान सभा / विधान परिषद), संसद सदस्य (लोकसभा / राज्य सभा), केंद्र शासन वा राज्य शासनाचा मंत्री तसेच कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेचा आजी सदस्य तसेच सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी तसेच मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नेमण्यात येऊ नये.

## ६.	ओळखपत्र :

उमेदवारांप्रमाणे निवडणूक प्रतिनिधींना देखील छायाचित्र असलेले ओळखपत्र देण्यात येते. त्यासाठी उमेदवाराने २ प्रतीत विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा. त्याने सादर केलेल्या नमुन्यावरच उजव्या कोपऱ्यात निवडणूक प्रतिनिधीचा फोटो लावावा व सदर फोटो निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने साक्षांकीत केल्यानंतर तेच ओळखपत्र म्हणून वापरता येईल.

# प्रकरण - ८

## आचारसंहिता व इतर

१. **उमेदवाराने विचारात घ्यावयाचे अन्य महत्त्वाचे आदेश. (सदर आदेश राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर ( https://mahasec.maharashtra.gov.in ) उपलब्ध आहेत. :**

१. मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील आदेश क्रमांक रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४२/का-७, दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२५ अन्वये आदर्श आचारसंहितेबाबत एकत्रित आदेश देण्यात आले आहेत.

२. पोस्टर्स, पॅम्प्लेटस् छपाई वरील निर्बंध (राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.- एसईसी १०९५/सीआर-७७/९५/ डेस्क-३, दि.२८/०८/१९९५).

३. निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५, क्र.रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.५/का-१०, दि. ०९ ऑक्टोबर, २०२५.

४. उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे तसेच संदर्भातील आदेश क्र. रानिआ-२०२३/उनिख/प्र.क्र.१३/संगणकीकरण कक्ष (ब), दि.१५/०२/२०२४.

५. महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश क्र.रानिआ/रापनो/२०२४/प्र.क्र.२४/का-११, दि. ०५ मे, २०२५ व दि.०७ नोव्हेंबर, २०२५

६. कायदा व सुव्यवस्थेबाबत एकत्रित आदेश क्र. रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४१/का-७, दि. ०४ नोव्हेंबर, २०२५

७. निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकरीता सर्वसाधारण सूचना व आदेशांचा सारसंग्रह, डिसेंबर, २०२५.

८. राज्य निवडणूक आयोगाकडे दि. ०७ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत नोंदणी झालेल्या पक्षांची यादी व चिन्हांची यादी अधिसूचना क्र. रानिआ/रापनों-२०२५/प्र.क्र.५४/का-११, दि.०८ नोव्हेंबर, २०२५.

## २. खर्चाची मर्यादा :

महानगरपालिका निवडणुकांकरिता उमेदवाराने करावयाच्या निवडणूक खर्चाची मर्यादा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे:-

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | सुधारीत खर्चाची मर्यादा (रुपये) |
|---|---|---|
| | **महानगरपालिका सदस्य** | |
| १ | बृहन्मुंबई | १५,००,०००/- |
| २ | अ वर्ग ( पुणे व नागपूर ) | १५,००,०००/- |
| ३ | ब वर्ग ( नाशिक, ठाणे व पिंपरी-चिंचवड) | १३,००,०००/- |
| ४ | क वर्ग ( नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, वसई-विरार व छत्रपती संभाजीनगर ) | ११,००,०००/- |
| ५ | ड वर्ग ( उर्वरित १९ महानगरपालिका) | ९,००,०००/- |

उमेदवाराने उक्त नमूद मर्यादेतच निवडणूक खर्च करावयाचा आहे.

## ३. निवडणूक खर्चाकरीता बँक अकाउंट :

निवडणुकीमध्ये उमेदवारांनी निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे तसेच त्याअनुषंगाने करावयाची कार्यपध्दती निश्चित केली आहे. त्यानुसार निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने राष्ट्रीयकृत/ शेड्यूल्ड/ सहकारी बँकेत एक स्वतंत्र खाते (बचत किंवा चालू) उघडावे व त्या खात्याचा तपशील नामनिर्देशनपत्र दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करावयाचा आहे.

उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत अशा बँक खात्याच्या पासबुकच्या पहिल्या पृष्ठाची प्रत आणि अद्ययावत अकाऊंट स्टेंटमेंटची स्वसाक्षांकित प्रत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

## ४. निवडणूक खर्चाचा हिशोब ३० दिवसात सादर करण्याबाबत हमीपत्र :

उमेदवाराने विहित नमुन्यात निवडणूक खर्चाचा तपशील निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सादर न केल्यास तो अनर्ह ठरू शकतो तसे हमीपत्र नामनिर्देशन पत्रासोबत घेण्यात येते.

## ५. प्रचार :-

i) निवडणूक प्रचार काळामध्ये सकाळी ६.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत उमेदवारांना ध्वनिक्षेपकाचा वापर करता येईल. या वेळेव्यतिरिक्त ध्वनिक्षेपकाचा वापर झाल्यास असा ध्वनिक्षेपक आणि तो जर एखादया वाहनावर बसविलेला असेल तर त्या वाहनासह तो जप्त करण्यात येईल.

ii) प्रचारफेरी किंवा प्रचार मिरवणुकीत महापालिका क्षेत्रामध्ये जास्तीत जास्त तीन वाहनांचा समावेश करण्यात येईल. ही प्रचारफेरी अथवा मिरवणूक जर एकाच उमेदवाराची असेल तर त्या उमेदवाराने त्या प्रचारफेरीचा येणारा खर्च आपल्या खर्चात समाविष्ट केला पाहीजे.

iii) जर प्रचार फेरी पक्षातर्फे अथवा आघाडीतर्फे काढण्यात आली असेल तर ती प्रचार फेरी अथवा मिरवणूक ज्या प्रभागामधून जाईल त्या सर्व प्रभागामधील त्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या उमेदवारामध्ये तो खर्च विभागून दाखविण्यात येईल.

iv) निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवाराने / राजकीय पक्षाने/ राजकीय आघाडीने / संघटनांनी निवडणुकीसाठी मतदान समाप्तीच्या वेळेच्या ४८ तास (दोन दिवस) अगोदर सायंकाळी ५.३० वाजता प्रचार थांबविणे बंधनकारक राहील.

## ६. नकली (डमी) मतपत्रिका

उमेदवारानी नकली (डमी) मतपत्रिका आपल्या मतदारांना माहिती देण्यासाटी छापण्यास हरकत नाही. तथापि, सदर मतपत्रिकेवर त्यांनी स्वतःचे नाव, अनुक्रमांक आणि चिन्ह इतकीच माहिती त्याच्यावर छापावी. अन्य कोणत्याही उमेदवाराचे नाव, अनुक्रमांक आणि चिन्ह नकली मतपत्रिकेवर छापण्यात येऊ नये. अशी दुसऱ्या उमेदवाराचे नाव छापलेली मतपत्रिका आढळून आल्यास त्या जप्त करुन संबंधिताविरुध्द कडक कार्यवाही करण्यात येईल. तसेच पांढऱ्या, फिका गुलाबी, फिका पिवळया, फिका निळया व यथास्थिती फिका हिरव्या रंगाची मतपत्रिका मतदान केंद्रावर वापरण्यात येणार आहे. त्याऐवजी दुसऱ्या रंगाची नकली मतपत्रिका छापण्याची परवानगी निवडणूक निर्णय

अधिकारी यांच्याकडून घ्यावी. तसेच सदर मतपत्रिका मतदान केंद्रावर वापरण्यात येणाऱ्या मतपत्रिकेपेक्षा वेगळया आकाराची असावी, जेणेकरुन त्यामधील फरक त्वरीत लक्षात येईल.

**७. नकली (डमी) बॅलेटिंग युनिट :-**

परिच्छेद क्रमांक - ४ मधील ब नकली (डमी) बॅलेटिंग युनिट

i) सदर बॅलेट युनिट लाकडी, प्लास्टिक, प्लायवुड मध्ये तयार करता येईल.

ii) त्यास सफेद (White) व करडा (Grey) रंग असू नये.

iii) साईज: लांबी X रुंदी X उंची

१०' X ६'X१'

उमेदवार तसेच राजकीय पक्षांची नकली (डमी) बॅलेटिंग युनिट तयार करुन घेण्यास हरकत नाही. त्याव्दारे मतदारांना माहिती देणे सुलभ होईल. मात्र अशी नकली बॅलेटिंग यूनिट लाकडी, प्लॅस्टिक अथवा प्लायवुडची असावीत व ती अधिकृत बॅलेटिंग युनिटच्या अर्ध्या आकाराची असावीत व त्यास अधिकृत बॅलेटिंग युनिटला असलेला रंग वगळून अन्य रंगामध्ये तयार करण्याची अनुमती देण्यात येईल.

**८. अनधिकृत ओळखपत्र चिठ्ठी :-**

राजकीय पक्ष तथा उमेदवारांनी मतदारांना मतदान केंद्र तसेच त्याचा मतदार यादीतील अनुक्रमांक सापडणे सुलभ व्हावे यासाठी अनधिकृत ओळखपत्र चिठ्ठी देण्यास हरकत नाही. त्यावर १) मतदाराचे नाव, २) प्रभाग क्रमांक, ३) भाग क्रमांक, ४) अनुक्रमांक. ५) मतदान केंद्र क्रमांक, ६) मतदान केंद्राचे ठिकाण इत्यादी माहिती छापण्यात हरकत नाही. सदरची चिठ्ठी पांढऱ्या कागदावर असावी. मात्र त्यावर कोणत्याही राजकीय पक्ष, उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक चिन्ह छापता कामा नये तसेच त्यावर कोणतीही घोषणा अथवा कोणत्या उमेदवारास मत देण्याबाबतचे आवाहन छापता

कामा नये. अशी उमेदवाराचे / पक्षाचे निवडणूक चिन्ह याची छपाई केलेली ओळख चिठ्ठी मतदान केंद्रापासून १०० मीटर अंतराच्या आत कोणतीही व्यक्ती वाटताना आढळून आल्यास सदर व्यक्तीवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**९. छपाई स्वरुपाच्या प्रचार साहित्याबाबत पाळावयाची बंधने :-**

निवडणूक लढविणाऱ्या छापील स्वरुपाच्या प्रचार साहित्यावर (माहितीपत्रके, हस्तपत्रके, फ्लेक्स बोर्ड अगर भितीपत्रके यावर मुद्रक व प्रकाशक यांची संपूर्ण नावे व संपूर्ण पत्ते नमुद करणे अत्यावश्यक असून, असे प्रचार साहित्य छापण्यापूर्वी प्रकाशकाने स्वतःची ओळख पटविणारे व स्वतःची स्वाक्षरी केलेले निवेदन (त्यास व्यक्तिशः ओळखणाऱ्या दोन किंवा अन्य व्यक्तिच्या साक्षांकनासह) मुद्रकाकडे पाठविले पाहिजे आणि मुद्रकाने अशा प्रचार विषयक साहित्याची छपाई केल्यानंतर ज्या उमेदवारातर्फे अगर अन्य कोणा व्यक्तितर्फे ते छापले आहे, ते स्पष्ट करणाऱ्या स्वतःच्या स्वाक्षरीसह केलेल्या निवेदनासह छापण्यात आलेल्या प्रचार साहित्याच्या एका प्रतिसह (महानगरपालिकेच्या) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाठविले पाहीजे.

**१०. स्वच्छता राखण्यासाठी भिंतीवर जाहिराती न लावणे :-**

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने अगर त्याच्या वतीने कोणही व्यक्तीने संबंधीत मिळकतीच्या मालकाची किंवा शासनाची किंवा स्थानिक संस्थांच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणताही बोर्ड अथवा प्रचाराच्या जाहीराती लावू नयेत.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने अगर त्याच्या वतीने अन्य कोणाही व्यक्तीनी कोणतीही खाजगी मालकीची जागा इमारत स्मारके, पुतळयाचे चौथरे, भिती कुंपणे, वृक्ष अथवा सार्वजनिक वापराच्या जागांचे विद्रुपीकरण होईल अशा रितीने निवडणूक प्रचार विषयक पत्रके, जाहीराती कापडी फलक, भित्तीपत्रके वगैरे लावू नयेत.

## ११. प्रचाराच्या जाहिराती प्रसिध्दीबाबत :-

i) निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या सर्वसाधारणे अगर विशेष लेखी परवानगीशिवाय कोणताही पक्ष आघाडी / फ्रंट किंवा इतर कोणतीही संघटना, संस्था अगर व्यक्ती यांनी कट आऊटस् जाहिरात फलक, कापडी फलक इत्यादी लावू नयेत.

ii) निवडणुकीच्या प्रचारामध्ये प्राण्यांचा वापर करता येणार नाही.

iii) मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध या कायद्यांतर्गत निवडणुकीसंबंधी फ्लेक्सबोर्ड लावावयाचे झाल्यास महानगरपालिकेची परवानगी घ्यावी लागेल. अशी परवानगी निवडणूकीचा प्रचार कालावधी संपतो तिथपर्यंत देणेत येईल. त्यामुळे सर्व उमेदवारांनी आपले फ्लेक्सबोर्ड निवडणुकीचा कालावधी संपण्यापूर्वी ४८ तास आधी काढून घ्यावेत. फ्लेक्सबोर्ड काढणेची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही याची नोंद घ्यावी.

iv) इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमातून जाहिराती, मुलाखती प्रसिध्द केल्यास त्याचा खर्च संबंधीत उमेदवाराचे खर्चात समाविष्ट करणेत यावा.

## प्रकरण – ९

## मतदान यंत्र व स्ट्राँग रुम इ.

१) मतदान यंत्र तयार करण्याची कार्यवाही कोठे आणि कधी होणार आहे याचा तपशील.

२) स्ट्राँग रुम, मतमोजणीचे ठिकाण इ. तपशील तसेच स्ट्राँगरुम सिलींग व उघडण्याकरिता कधी उपस्थित रहाणे आवश्यक आहे याची माहिती.

३) मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक मतदानाची यंत्राची तयारी :-

४) मतदान यंत्र तयार करताना उमेदवारांनी अगर त्यांची प्रतिनिधी हजर राहणेबाबत.

५) मतदानाच्या तारखेपूर्वी एक आठवडा अगोदर मतदान यंत्रे तयार (Set & Seal) (Commissioning of EVMs) करता येतील. मतदान यंत्रे मतदानासाठी तयार करण्याच्या तारखेपूर्वी उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांना मतदान यंत्रे मतदानासाठी किती तारखेस कोणत्या वेळी व कोणत्या ठिकाणी तयार करण्यात येणार आहेत, याबाबतची लेखी सूचना निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडून देणेत येईल. त्यावेळही हजर राहणे आवश्यक आहे. उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी हजर असल्यास अथवा कोणीही हजर नसल्यास निवडणूक निर्णय अधिकारी काम सुरु ठेवतील. उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी उपस्थित राहील्यास मतदान यंत्रे मतदानासाठी कशा प्रकारे तयार करण्यात येतात हे त्यांना समजावून सांगणेत येईल. तसेच त्यांना कंट्रोल यूनिट व बॅलटिंग युनिट तयार करतेवेळी त्याचे निरीक्षण करण्याची संधी देणेत येईल. त्यांनी तशी इच्छा व्यक्त केल्यस त्यांना पत्त्याच्या खूणचिठ्ठीवर आपली सही करण्याची अनुमती देण्यात येईल.

६) मतदानासाठी तयार करण्यात आलेली सर्व मतदान यंत्रे राखीव मतदान यंत्रांसह स्ट्रॉग रुममध्ये सुरक्षित ठेवण्यात येतील. मतदान यंत्रे सुरक्षित ठेवलेली खोली (स्ट्रॉग रुम) मतदान केंद्रावर यंत्रे देण्याच्या दिवशीच उघडयात येईल. ही खोली उघडण्याबाबतच्या लेखी सुचना, तारीख व वेळेसह निवडणूक लढविणारे उमेदवार व त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांना पाठविण्यात येईल.

काही आकस्मिक व न टाळता येणाऱ्या कारणांमुळे स्ट्रॉग रुम नियोजित वेळेच्या व तारखेच्या आधी उघडणे भाग पडल्यास उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीतच सदर खोली उघडणेत येईल.

(७) मतदान केंद्रावर मतदानाच्या दिवशी सकाळी ६.३० वाजता मतदानासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र तयार ठेवण्याचे काम सुरु होईल. उमेदवार स्वतः त्याचे अधिकृत प्रतिनिधी यांनी संबंधित मतदान केंद्रावर मतदानाच्या दिवशी सकाळी ६.३० वाजताचे पूर्वी उपस्थित रहावे म्हणजे उमेदवार अथवा त्याचे मतदान प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत ठिक सकाळी ६.३० वाजता तेथील मतदान केंद्राध्यक्ष इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मतदानासाठी तयार ठेवण्याची तजवीज करतील. उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी वरील प्रमाणे वेळेवर उपस्थित न राहिल्यास त्यांच्या अनुपस्थितीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मोहार (सीलबंद) केले जाईल व त्यानंतर त्याबाबत उमेदवार व त्यांचे मतदान प्रतिनिधी यांची कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणर नाही. तसेच त्या दिवशी सायंकाळी मतदान संपल्यांनतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मोहोर (सीलबंद) करण्याच्या वेळीही उमेदवार स्वतः अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी यांनी उपस्थित रहावे अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मोहार (सीलबंद) केले जाईल व त्या कामी नंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर लावल्या जाणाऱ्या मोहोरेवर व सांविधिक पाकिटावर हजर असणाऱ्या उमेदवारांनी अगर त्यांच्या प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या कराव्यात.

# प्रकरण – १०

## मतदान प्रक्रिया व इतर

### १) मतदानाची पध्दत :-

i) मतदान गुप्त पध्दतीने मतदाराने समक्ष हजर राहून करावयाचे आहे.

ii) मतदारास त्याने प्रतिनिधीव्दारा (प्रॉक्झीव्दारा) मतदान करता येणार नाही.

iii) मतदानाच्या दिवशी निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या दिवशी मतदान अखंडपणे चालू राहील.

iv) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राव्दारे मते नोंदविणे असून प्रत्येक जागेसाठी त्यांच्या पसंतीच्या कोणत्याही एकाच उमेदवाराचे नावापुढे व चिन्हापुढे मत नोंदविण्यासाठी राखून ठेवलेले बटन दाबून मत नोंदवू शकेल.

v) मतदानाच्या दिवशी मतदान संपण्याच्या वेळी मतदान केंद्रासमोर रांगेत उभ्या असलेल्या शेवटच्या व्यक्तीपासून पहिल्या व्यक्तिपर्यंत मतदान केंद्राध्यक्ष आपली स्वाक्षरी करुन क्रमांक घालून चिठ्ठया देतील. मतदानाची विहीत वेळ संपल्यानंतरही परंतु वेळेअगोदर रांगेत असणाऱ्या सर्व मतदारांना मतदान करता येईल.

vi) मतदान केंद्राबाहेर वयोवृध्द व्यक्ती, अंध -अपंग मतदार व त्यांच्या सोबती, गरोदर स्त्रिया अथवा तान्ह्या मुलांसह असणाऱ्या स्त्रिया मतदारांना प्राधान्याने मतदान करण्याची संधी देण्यात येईल (रानिआ यांच्याकडील आदेश क्र. रानिआ/मनपा २०११/प्र.क्र. २०/का ५ दि. ५ डिसेंबर २०११)

### २) मतदान केंद्रांची यादी :-

मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर वेबसाईटवर उपलब्ध राहील. तसेच ही यादी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयातून घेता येईल.

### ३) मतदार यादीचे भाग पाहणे :-

प्रभागाच्या मतदार यादी निरनिराळे भाग असून (त्याभागास पुरवणी, दुरुस्ती यादी असल्यास) त्या यादीची कृपया आपण दखल घ्यावी, म्हणजे मतदानाच्या दिवशी अथवा ओळखचिठ्ठया देताना आपला गोंधळ होणार नाही.

### ४) मतदान केंद्रातील प्रवेश व इत्यादीबाबत. :-

मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदानाच्या दिवशी व वेळेसंबंधी उमेदवार किंवा त्यांचे अधिकृत मतदान प्रतिनिधी यांना बिल्ले लावून हजर राहता येईल. सदर मतदान केंद्राच्या ठिकाणापासून १०० मीटरच्या अंतरावर बाजूंनी रस्त्यावर पांढरे पट्टे ओढण्यात येणार आहेत. सदर १०० मीटरच्या आत मधील मतदान केंद्राच्या क्षेत्रातील सार्वजनिक जागेवर अथवा खाजगी जागेवर कोणत्याही उमेदवारास व प्रतिनिधीस अथवा कोणासही आपले बुथ उभारता येणार नाहीत, अथवा कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करता येणार नाही. तसेच सदर परिसरात कोणासही राजकीय वा इतर पक्षाची चिन्हे असलेली बिल्ले अथवा पत्रके इतर पत्रके आणता येणार नाही. तसेच उमेदवारास अगर त्यांचे प्रतिनिधीस खालीलपैकी कोणत्याही गोष्टी करता येणार नाहीत.

i) मतासाठी प्रचार अगर मतदारास स्वतःची ओळख करुन देणे किंवा नमस्कार करणे अगर

ii) एखादया मतदाराचे मत मिळविणे अगर

iii) कोणत्याही विवक्षित उमेदवारास मत न देण्याबाबत मतदाराचे मन वळवणे अगर

iv) निवडणुकीमध्ये मत न देण्याबाबत मतदाराचे मन वळविणे अगर

v) निवडणुकीसंबंधी जाहीराती अगर भित्तीपत्रके लावणे व निवडणूक चिन्हांची मोठ्या प्रमाणात प्रतिकृती करुन ती मिरविणे.

vi) उमेदवार अगर उमेदवार प्रतिनिधी यांना मतदान केंद्रात मतदान प्रक्रियेचे निरीक्षण करता येईल मात्र त्यांनी मतदान केंद्रात थांबू नये.

vii) मतदान केंद्रात नेमण्यात येणाऱ्या मतदान प्रतिनिधीनी मोबाईल फोन सोबत आणू नयेत व मतदारांनी देखील मोबाईल फोन सोबत आणू नयेत. मात्र फोन जमा करण्याची सुविधा केली असल्यास त्या ठिकाणी मतदान केंद्राबाहेर जमा करता येतील.

viii) संबंधित उमेदवारांनी मतदार आणण्यासाठी भाडोत्री व खाजगी वाहनांचा वापर करणे, मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदानाच्या दिवशी लाऊडस्पीकर वरुन प्रचार करणे, मतदान केंद्रावर मतदानासाठी येणाऱ्या मतदारांनी अडथळा करणे, अथवा मतपत्रिका, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे हलविणे अथवा त्यांची खराबी करणे, आधी निवडणूकीतील गैरप्रकारची कृत्ये समजली जातील अशी कृत्ये टाळावीत.

**५) आक्षेपित मते :-**

एखादया मतदाराबाबत आक्षेप घेणे असल्यास त्याकामी मतदान केंद्राध्यक्षाकडे विहीत नमुन्यात प्रतिज्ञापत्र भरुन त्यासोबत अशा प्रत्येक मतदारासाठी रक्कम रु. २०/- इतकी अनामत रक्कम भरावी लागेल. त्याशिवाय आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. आक्षेप खोडसाळपणाने व मतदानाच्या कामात अडथळा आणण्याच्या हेतूने घेतला आहे असे मतदान केंद्राध्यक्ष यांना वाटल्यास किंवा आढळून आल्यास अनामत रक्कम जप्त केली जाईल. याशिवाय अशा व्यक्तिविरुध्द अन्य कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

**६) मतदारांची ओळख पटविण्याकरीता ग्राह्य धरण्यात येणारे पुरावे :-**

मतदारांची ओळख पटविण्याकरीता ग्राह्य धरण्यात येणारे पुरावे कोणते राहतील याबाबत राज्य निवडणूक आयोगाने दिनांक १४ जुलै, २०२५ रोजी सुधारीत आदेश काढले आहेत.

| अ.क्र. | खालीलपैकी कोणतेही ओळखपत्र पुराव्यादाखल मतदाराने सादर करावे |
|---|---|
| १ | मतदार ओळखपत्र |
| २ | भारताचा पासपोर्ट |
| ३ | आधार ओळखपत्र |
| ४ | वाहन चालविण्याचा परवाना |
| ५ | आयकर विभागाकडील पॅन ओळखपत्र |
| ६ | केंद्रशासन / राज्य शासन / सार्वजनिक उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहित दिलेली ओळखपत्रे |
| ७ | राष्ट्रीयकृत बँका अथवा पोस्ट ऑफिस यामधील खातेदाराचे फोटो असणारे पासबुक |
| ८ | सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला फोटोसहित अपंगत्वाचा दाखला |
| ९ | राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखालील, फोटो असलेले ओळखपत्र (MNREGA जॉब कार्ड) |
| १० | निवृत्त कर्मचाऱ्यांची अथवा त्यांच्या विधवा / अवलंबित व्यक्ती यांची फोटो असलेली निवृत्ती वेतन विषयक कागदपत्रे उदा. पासबुक, प्रमाणपत्र इ. |
| ११ | लोकसभा / राज्यसभा सचिवालय तसेच विधानसभा / विधानपरिषद सचिवालय यांनी आपल्या सदस्यांना दिलेले अधिकृत ओळखपत्र |
| १२ | स्वातंत्र्य सैनिकाचे फोटो असलेले ओळखपत्र |
| १३ | केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाने दिलेले आरोग्य विमा योजनेचे फोटोसहित कार्ड |

मतदाराने सादर केलेल्या ओळखीच्या पुराव्याबाबत शंका असल्यास केंद्राध्यक्ष शहानिशा करेल व इतर ओळखीच्या पुराव्याची मागणी करुन खात्री पटल्यानंतरच मतदान करु देईल. एखादा मतदान ओळखीबाबतचा समाधानकारक पुरावा कागदपत्रे सादर करु न शकल्यास त्यास मतदान करु दिले जाणार नाही.

# प्रकरण – ११

# मतमोजणी.

**मतमोजणी :-**

i) उमेदवारांना मतमोजणीसाठी निश्चित केलेले ठिकाण, दिनांक व वेळ तसेच मतमोजणीची व्यवस्था कशी करण्यात आलेली आहे याबाबत उमेदवारांना स्वतंत्रपणे कळविणेत येईल.

ii) सदरच्या मतमोजणीच्या वेळी उमेदवार स्वतः आणि त्यांचे मतमोजणी प्रतिनिधी यांना मतमोजणी टेबलच्या संख्येप्रमाणे हजर राहता येईल. मतमोजणीच्या वेळी त्यांना देण्यात आलेले ओळखपत्रे छातीवर दिसतील अशा तऱ्हेने लावणे जरुरी आहे. अशी ओळखपत्रे नसतील तर संबंधित व्यक्तिना मतमोजणी केंद्राच्या बाहेर काढण्यात येईल.

# प्रकरण – १२

## निवडून आल्याचे प्रमाणपत्र, एकापेक्षा अधिक जागांवर निवडून येणे व अनामत रकमेचा परतावा.

१) **निवडून आल्याचे प्रमाणपत्र** – निवडून आल्यानंतर निवडून आल्याचे प्रमाणपत्र संबंधित विभागीय आयुक्त यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. (दि. १० एप्रिल, १९९५ चे राज्य निवडणूक आयोगाचे पत्र)

२) **एकापेक्षा अधिक जागांवर निवडून येणे** –

एखादी व्यक्ती एकापेक्षा अधिक जागांसाठी निवडून आली तर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत निवडणूक नियम क्र.१२(ह) व मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २६के मधील तरतुदीनुसार विहित केलेल्या कालावधीमध्ये आपली पसंती लेखी कळविली पाहिजे. सदर बाबीची पूर्ण कल्पना उमेदवारास द्यावी.

२) **अनामत रक्कम परत करण्यासंदर्भातील अटी** -

महानगरपालिका निवडणुकांकरिता उमेदवाराने आपल्या नामनिर्देशनपत्रासोबत खालीलप्रमाणे अनामत रक्कम भरावयाची आहे.

| **उमेदवाराचा प्रवर्ग** | **महानगरपालिका निवडणुकांकरीता अनामत रक्कम** |
|---|---|
| सर्वसाधारण* | रु.५०००/- |
| अनुसूचित जाती | रु.२५००/- |
| अनुसूचित जमाती | रु.२५००/- |
| नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | रु.२५००/- |
| सर्व प्रवर्गातील महिला | रु.२५००/- |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत निवडणूक नियम क्र.१० व मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २६अ मधील तरतुदीनुसार नामनिर्देशन पत्रासोबत जमा करण्यात आलेली अनामत रक्कम ही निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आल्यानंतर, उक्त रक्कम ठेवणाऱ्यास किंवा त्याच्या वैध प्रतिनिधीस परत करण्यात आली पाहिजे किंवा यथास्थिती महानगरपालिकेच्या खाती जमा करण्यात आली पाहिजे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत निवडणूक नियम क्र. १०(२) व मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम २६ए (२) व (३) मधील तरतुदीनुसार अनामत रक्कम परत करण्यासंदर्भात कार्यवाही करावी.

सर्व उमेदवारांना मिळालेल्या वैध मतांच्या एकूण संख्येमध्ये NOTA ला मिळालेल्या मतांचा समावेश होणार नाही याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/ जिपपंस-२०१६/प्र.क्र.१२/का-७, दि.१९/०५/२०१६ विचारात घ्यावेत.

# प्रकरण – १३

# अनुसूची (फॉर्मस्, नमुने इ.)

येथे आवश्यक ते नमुने जोडावेत.

# प्रकरण – १४

## प्रभाग रचना, आरक्षण व नकाशा (आरक्षणाचे राजपत्र)

१. प्रभाग रचना व आरक्षण –

| प्रभाग क्रमांक | प्रभागाचे नाव | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जातीची लोकसंख्या | अनुसूचित जमातीची लोकसंख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | १अ- ..........<br>१ब- ..........<br>१क- ..........<br>१ड- .......... |
| २ | | | | | २अ- ..........<br>२ब- ..........<br>२क- ..........<br>२ड- .......... |
| ३ .... प्रमाणे | | | | | |

२. सर्व प्रभागांच्या सीमा आरक्षण तसेच निवडणूक निर्णय अधिकारीनिहाय प्रभागांच्या हद्दी दर्शविणारा एकत्रित नकाशा जोडावा –

# प्रकरण – १५

## निवडणूक निर्णय अधिकारी व महत्वाचे दूरध्वनी इ.

**निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय :-**

नागरिकांच्या सोईच्या दृष्टिने महानगरपालिकेच्या संबंधित निवडणूक प्रभागांचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय खालील ठिकाणी सुरु करण्यात आले आहे.

| अ.क्र. | निवडणूक निर्णय अधिकारी | संबंधित प्रभाग | कार्यालयाचा पत्ता | संपर्क क्र. व ईमेल |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

## महत्त्वाचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक

१. सर्व संबंधित सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक खर्च निरीक्षक, आचारसंहिता कक्ष इत्यादी महत्वाचे संपर्क क्रमांक व पत्ते असलेली यादी.